# नगरपरिषद कार्यालय, सावनेर जिल्हा नागपूर

## ई-निविदा सुचना

क्रमांक.नपसा/निविदा/स्ववआ./ 1559२६
कार्यालय नगरपरिषद सावनेर , जि. नागपूर
दिनांक - 11 / 05 /२०२६

मुख्याधिकारी नगरपरिषद सावनेर यांचे वतीने **"वित्त आयोग/ न. प. निधी इतर देय निधी अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तसेच घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ व २०२४ अन्वये सावनेर शहरातील घरोघरचा कचरा संकलन करणे, व्यावसायीक क्षेत्रातील कचरा संकलन करणे, कच-याची उचल करुन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प सावनेर पर्यंत वाहतुक करणे व प्रक्रिया करणे कामे करण्याकरीता अभिकर्त्याची नियुक्ती करणे "** अभिकर्त्याची नियुक्ती करणे, व इतर कामे करणे या कामाकरीता अनुभवी अभिकर्त्याची नियुक्ती करणे या कामी शासनमान्य, नोंदणीकृत व पात्र संस्थेद्वारे खालील कामांच्या ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेच्या पुर्ण अटी व शर्ती सविस्तर महाराष्ट्र शासनाच्या **http://mahatender.gov.in** या संकेत स्थळावरउपलब्ध आहे.)

**(ई-निविदा कंत्राटाचा तपशील)**

| वित्त आयोग /न.प. निधी किंवा इतर देय निधी अंतर्गत | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजीत रक्कम** | **अनामत रक्कम१%** | **निविदा फार्म किमंत** | **शेरा** |
| ०१ | शहरातील घरोघरचा कचरा संकलन करणे, व्यावसायीक क्षेत्रातील कचरा संकलन करणे, कच-याची उचल करुन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प सावनेर पर्यंत वाहतुक करणे व प्रक्रिया करणे कामे करण्याकरीता अभिकर्त्याची नियुक्ती करणे | १,६४,४२,५८८ /- | १,६४,४२५/- | ११६०/- (including 6% CGST + 6% MGST) (Non-Refundable) | |

अनुक्रमांक – 1

| अ.क्र. | तपशिल | कालावधी व वेळ |
|---|---|---|
| 1 | आँनलाईन निविदा प्रसिद्धी | दिनांक :- 15 / 05 /२०२६ ला सायं. ६.०० वाजता पर्यंत. |
| 2 | आँनलाईन निविदा सादर करणे | दिनांक :- 15 / 05 /२०२६ ला सायं ६.०० वाजता ते दिनांक:- 23 / 05 /२०२६ ला सायं. ५.०० वाजता पर्यंत. |
| 3 | आँनलाईन निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | दिनांक :- 25 / 05 /२०२६ ला दुपारी ५.०० वाजता (शक्य झाल्यास) |
| 4 | निविदा पूर्व बैठक दिनांक व वेळ | दिनांक :- 19 / 05 / २०२६ ला 12.०० वाजता पर्यंत. (मुख्याधिकारी कक्ष) |

## ई-निविदा प्रसिध्दीचे वेळापत्रक

**अटी व शर्ती –**

1. कंत्राटदाराने त्यांच्या नोंदणी संबंधीचे सर्व कागदपत्रे PDF स्वरुपात तसेच निविदा संच फी इसारा (EMD) रक्कम http://mahatender.gov.in द्वारे केवळ आँनलाईन स्वरुपात जमा करावी. या दोन्ही भरणा संबंधिचे दस्ताऐवजी स्कँन केलेल्या स्वरुपात ई-निविदासोबत सादर करणे बंधनकारक आहे.
2. निविदाधारकाने शहराची लोकसंख्या, निर्माण होणा-या कच-याचे प्रमाण, परिस्थिती नुसार कच-यातील घटक, कचरा प्रक्रीया केंद्राचे शहरापासूनचे अंतर, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प इ. बाबी बाबत अधिक माहितीसाठी नगरपरिषद कार्यालयातील आरोग्य विभागामध्ये अवलोकनार्थ ठेवलेली आहे.
3. एक वा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी सावनेर यांनी राखुन ठेवला आहे.
4. सर्व शासकिय कर इ. कपाती नियमानुसार बिलातुन करुन घेण्यात येतील.
5. मंजुर निविदा धारकास योग्य त्या अटी व शर्तीचा करारनामा करुन द्यावा लागेल.
6. नगरपंचायतीने/नगरपरिषदेने काळ्या यादीत समाविष्ट केलेले कंत्राटदारांना या निविदा प्रक्रीयेत सहभाग घेता येणार नाही.
7. निविदेबद्दल शुद्धीपत्रक असल्यास http://mahatender.gov.in या संकेतस्थळावरच प्रकाशित करण्यात येतील.
8. सविस्तर अटी व शर्ती ई-निविदा प्रसिद्धी पत्रकासोबत जोडलेल्या आहे.

मुख्याधिकारी
नगर परिषद सावनेर जि.नागपूर

**तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १**

१. नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

२. पॅनकार्ड, मागील ३ वर्षाचे आयकर परतावा. (Assessment Year २०२३-२४, २०२४-२५,२०२५-२६)

३. ई.पी.एफ.ओ. व ई.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र मागील ६ महिन्यांची चालान पावती.

४. संस्था काळ्या यादीत नसल्याचे स्वयं प्रतीज्ञापत्र.

५. व्यवसाय कर २०२५-२६ भरल्याची पावती.

६. जी. एस. टी. प्रमाणपत्र.

७. कंत्राटदारास मागील २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२५-२६ तीन वर्षाचे (३१ मार्च २०२६ पर्यंत) या वर्षाचे C.A. प्रमाणित टर्नओव्हर (उलाढाल रुपये २ कोटी रुपये चे .प्रमाणपत्र ) सादर करणे बंधनकारक राहील.

८. कंत्राटदारास शासन निर्णय नुसार C.A. यांचेकडून प्रमाणित केलेले बीड कॅपासिटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक व बंधनकारक शासन निर्णय दिनांक १७/०९/२०१९ नुसार दिलेल्या सूचनांनुसार सूत्र (एxएनx२)- बी या नुसार.

ए- मागील ५ वर्षातील जास्तीत जास्त उलाढाल

एन – देय कामाचा कालावधी

बी- हातातील कामांची किंमत (देय कामांच्या कालावधीतील)

९ . कंत्राटदारांचा जॉइंट व्हेन्चर पात्र ठरणार नाही.

१०. कंत्राटदारास या कार्यलयाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित नमुन्यातील (ऑनलाईन प्रसिद्ध झालेला) स्वयंघोषित केलेला अद्यावत स्वतःचे लेटर हेड वर स्वाक्षरी पत्र.

११. कंत्राटदाराने रुपये १००/- चे कोर्ट फी स्टँप पेपर वर नोटरीज करून सादर करण्यात येत असलेले सर्व दस्ताऐवज हे खरे असल्याबाबत अद्यावत नोटरिज स्वाक्षरी प्रमाणपत्र.

१२. कंत्राटदाराचा नगर परिषदेच्या कर्मचारी किंवा पदाधिकारी यांसोबत कोणत्याही प्रकारचे हित संबंध नसल्याचे विहित नमुन्यातील ऑनलाईन प्रसिद्ध झालेल्या परीशिष्ट (अ) अद्यावत प्रतिज्ञालेख रूपये १००/- चे कोर्ट फी स्टँप पेपर वर नोटरिज केलेला असावा.

१३. महानगरपालीका/ नगरपालीका/ नगरपरिषद मध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा कमीत कमी ०३ वर्षांचा नगरपालीका/ नगरपरिषद चे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

१४. कृती आराखडा व वाहतुक आराखडासह (Route Map) नगर परिषदला ई-निविदा सोबत अपलोड करणे बंधनकारक राहील.

१५. कंत्राटदाराने त्याच्या कार्यकाळात घनकचरा व्यवस्थापनाची कार्ये पार पाडत असताना खत निर्मिती करून दिल्याबाबत नगर परिषदेला महाराष्ट्र शासनाचे महा **हरित ब्रांड प्रमाणपत्र** प्राप्त करून दिल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र.

| स्वच्छता व आरोग्य निरीक्षक | अभियंता | लेखापरीक्षक | लेखापाल | मुख्याधिकारी |
|---|---|---|---|---|
| नगर परिषद सावनेर | नगर परिषद सावनेर | नगर परिषद सावनेर | नगर परिषद सावनेर | नगर परिषद सावनेर |

## ... व शर्ती

१) सदर कामाची भविष्यात उपलब्ध होणाऱ्या वित्त आयोग मधून प्रशासकीय मान्यता नुसार देण्यात येईल. सदर कामाची मुदत १ वर्षापर्यंत राहील. आवश्यकतेनुसार मा. अध्यक्ष /मुख्याधिकारी यांची परवानगी घेवून मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

२) नगर परिषद कडे प्राप्त होणाऱ्या वित्त आयोग निधी / नगर परिषद निधीच्या किंवा इतर देय निधीच्या उपलब्धते नुसार कामाचे देयक प्रदान करण्यात येईल. देयक देण्यास उशीर झाल्यास त्यावर अतिरिक्त व्याज देण्यात येणार नाही किंवा अतिरिक्त व्याज मागण्याचा अधिकार कंत्राटदारास राहणार नाही.

३) कंत्राटदार ठेकेदार यांच्याकडील कामगारांच्या देय रक्कमा बाबत नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. या कामगारांना न.प.च्या आस्थापनेवर कायम अस्थायी नेमणूक मागण्याचा अधिकार असणार नाही. कामगार कायदयाचे पालन करण्याची जबाबदारी संपूर्णता कंत्राटदाराची राहील.

४) सकाळी ६.०० ते दुपारी ४.०० या काळात (आवश्यकतेनुसार बदल अभिप्रेत राहील) कचरा संकलनासाठी प्रत्येक प्रभागातील घरे व सहकारी गृहरचना संस्था इ. यांचा ओला, सुका व घातक कचरा (HZ.Waste), सॅनिटरी वेस्ट वेगवेगळा घेणे ठेकेदारावर बंधनकराक राहील तसेच शहरातील घरांमधून कचरा संकलित करताना तो ICT आणि GPS प्रणालीनुसार करणे आवश्यक राहील,अनुकुल परिस्थितीनुसार ठरवून दिलेल्या वेळेप्रमाणे संकलन व वाहतूक करणे बंधनकारक राहील.

५) **नगरपरिषद सावनेर** कडे उपलब्ध घंटागाडी ५, ट्रॅक्टर २ असे वाहने व कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकात नमूद घंटागाडीद्वारे व इतर वाहनाद्वारे कचरा संकलनाचे काम करावे लागेल. पुरविण्यात आलेल्या घंटागाड्यांत काही तांत्रिक बिघाड झाल्यास कंत्राटदाराने स्वतः खर्चाने त्यांची दुरुस्ती करून द्यावी लागेल. दुरुस्तीच्या वेळ मध्ये कंत्राटदारास स्वतःचे वाहन सदर कामी उपलब्ध करून द्यावे लागेल. तसेच घनकचरा संकलनाच्या वेळी अतिरिक्त वाहनाची आवश्यकता पडल्यास कंत्राटदाराने ते स्वखर्चाने वाहन उपलब्ध करून द्यावे लागेल. नगर परिषद कडील कंत्राटदाराला सोपविण्यात आलेली वाहने कंत्राट संपल्यानंतर सुस्थितीत चालू स्थितीत वाहनांची सर्विसिंग करून वाहनाचा विमा, पी.यु.सी. , व फिटनेस प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. अन्यथा वाहन दुरुस्ती किंवा सर्विसिंग व इत्यादी करिता जो खर्च येतील तो खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येतील किंवा इतर देयकातून कपात करण्यात येईल. **वाहनाचा विमा काढणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील**.

६) सुरक्षा अनामत रक्कम प्रत्येक मासिक देयकातून ७% कपात करण्यात येईल. कपात करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम प्रदान केलेल्या देयकाचे लेखापरीक्षण झाल्यानंतर लेख आक्षेपात निघालेली वसूल पात्र रक्कम कपात करून अदा करण्यात येईल.

७) ओला व सुका कचरा विलगीकरण करुन वेगवेगळा करुन संकलीत करणे व नागरीकांना प्रोत्साहीत करणे, जनजागृती करणे याची जबाबदारी संबंधीत ठेकेदार यांची राहील.

८) वाहनाच्या विम्याची रक्कम हि देखभाल दुरुस्तीच्या रकमेतून भरणा करण्यात येईल. (अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार)

९) काही अपरिहार्य कारणास्तव नेमूण दिलेल्या भागातील कचरा संकलनात व वाहतूकीस अडचण निर्माण झाल्यास त्याची पर्यायी व्यवस्था तातडीने करणे ठेकदार यांना बंधनकारक राहील. तसेच कचरा वाहून नेण्यासाठीचा मार्गसंबंधी अडचणी आल्यास सावनेर नगरपरिषदेने सुचविल्यापमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१०) काम करताना मजूर अथवा साधने यांचे पासून कुठल्याही नागरिकांना त्रास होता कामा नये व पर्यावरण बिघडेल अशी कोणतीही कृती करता कामा नये ( **पर्यावरण व मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे वेळोवेळी सुचनेप्रमाणे काम करावे लागेल** ) जर अशा प्रकारचे उल्लंघन झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदारावर राहील.

११) कार्यादेश दिल्यापासुन ७ दिवसाचे आत काम सुरु करावे लागेल विहित कालावधीत काम सुरु न केल्यास रु. ५०००/प्रति दिन दंड केला जाईल. काम सुरु करण्यापूर्वी काम सुरु करण्याचे दिनांक व वेळ नगरपरिषदेला कळविणे बंधनकारक राहील.

१२)नागरीकाकरिता हेल्प लाईन नं. गाडीवर नमूद केलेला असावा व मृतजनावरांच्या तक्रारींचे निराकरण ४ तासाच्या कालमर्यादेत करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१३) सर्व प्रभागामध्ये ठरलेल्या वेळी घंटागाडी व कचरा उचलण्याचे वाहन पोहचवून कचरा उचलण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याचे बंधन निविदाधारकावर राहील. कचरा मुक्त शहर करणे बंधनकारक राहील.

१४) किमान वेतन कायदा प्रमाणे अंमलबजावणी बंधनकारक राहील व कंत्राटदारास त्याच्याकडील कामगारांना सुरक्षतेची साधने उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

१५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF), (ESIC) , PT, तसेच इतर कामगार विषयक कायदे, नियम, शासन निर्णय आदेश यांचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

.) पर्यावरण संतुलन प्रदूषण नियंत्रण कक्ष बाबत शासनाच्या निदेशाप्रमाणे कार्यप्रणाली राहील ठेकेदारास खालील नियम व कायदया अंतर्गत काम करावे लागेल (महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५) तसेच शासनाने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास त्यानुसार त्याचा अवलंब करणे आवश्यक राहील. घनकचरा व्यवस्थापण नियम २०१६ व प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२४ त्या खालील असलेले सर्व नियमाअंतर्गत आवश्यक असलेला किमान दर्जा राखावा लागेल तसेच घनकचरा व्यवस्थापनाकरिता वेळोवेळी प्रकाशित होणारे शासन आदेश अधिनियम यांचा अवलंब करणे बंधनकारक असेल.

१७) संपुर्ण कामाचा मासिक अहवाल दर महिन्याच्या शेवटच्या तारखेस नगरपरिषद कार्यालयात स्वच्छता व आरोग्य विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

१८) आठवडी बाजार, भाजी बाजार, दैनंदिन बाजार, दिवाळी/ मोहरम/ गणेश उत्सव, नवरात्री/ जयंती /यात्रा / सामाजिक कार्यक्रम सार्वजनिक सभा व इतर न.प.चे महत्वाचे कार्यक्रम याप्रसंगी निर्माण होणाऱ्या कचरा त्याची विल्हेवाट प्रथम प्राधान्याने करणेस ठेकेदार जबाबदार असेल. सणासुदीच्या दिवशी आयोजित ठिकाणातील निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे नियोजन त्याच दिवशी करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

१९) ओला व सुका आणि घातक कचरा गोळा करून विल्हेवाट लावणे संबंधी निरिक्षणामध्ये त्रुटी आढळून आल्यास कोणत्याही नेमूण दिलेल्या क्षेत्रामध्ये प्रकरणनिहाय प्रत्येक भागासाठी प्रति दिन घंटागाडी रुपये १०००/- जागेवरच वसुल करण्याचे अधिकार नगरपरिषदेस राहतील. दंडाची रक्कम न भरल्यास संबंधित ठेकेदाराचे देय बिलातून वसुल केली जाईल व दंडाची रक्कम नगरपंचायतेचे फंडामध्ये जमा केली जाईल. तसेच कचरा विल्हेवाट लावणे कामात विलंब लागल्यास व त्या कामाकरीता नगरपरिषदेचे कामगार लावल्यास त्या होणाऱ्या खर्चाची वसुली कंत्राटदाराच्या देय मधून नगरपरिषद वसुल करेल.

२०) न. प. क्षेत्रामध्ये साथीच्या रोगाचे व साथ सदृष्य कालावधीत मुख्याधिकारी यांचे आदेशाप्रमाणे कचरा विल्हेवाटी करीता विशेष व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

२१) सदरहु कामाविषयी शासनाची फी तसेच सर्व प्रकारचे टॅक्सेस भरण्याची व परवाने प्राप्त करण्याची जबाबदारी ठेकेदारची राहील.

२२) मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या संबंधीत अधिकारी यांच्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२३) नैसर्गिक आपत्ती अथवा आणीबाणीच्या परिस्थितीत कंत्राटदाराची संपुर्ण यंत्रसामुग्री व मनुष्यबळ हे मुख्याधिकारी यांच्या आदेशानुसार कामकाज करील,

२४) कचरा संकलन करण्याची व साठविण्याचे थांबे ठेकेदार **नगरपरिषद सावनेर** संबंधीत भागातील नागरीक व स्थानिक नगरसेवक यांच्या सामोपचाराने अनुकुल परिस्थितीनुसार वेळ ठरविणे, झोपडपट्टया व लहान गल्ली बोळातील कचरा संकलनाकामी आवश्यकते नुसार वाहने व थांबे यांची त्या दृष्टीने व्यवस्था करणे संबंधीत ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील. याबाबतचा कृती आराखडा व वाहतुक आराखडासह (GPS Route Map) नगर परिषदेच्या संमतीने ठरविण्याचा आहे.

२५) मंजुर निविदाचे २% अनामत रक्कम ( १% निविदेसोबत व १ % निविदा मंजुरीनंतर) व योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल व त्यानंतरच कामाचा कार्यादेश दिला जाईल. कंत्राटदाराच्या देयकातून शासकीय नियमानुसार आवश्यक त्या कपाती करण्यात येईल.

२६) कंत्राटदाराच्या मार्फत लावण्यात येणाऱ्या जे.सी.बी. मशीनचे दैनंदिन लॉग बुक नगर परिषदेस सादर करावे लागेल. त्यानुसारच देयके प्रदान करण्यात येईल. (अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार)

२७) सदर कामासंबंधी मुख्याधिकारी यांच्या आदेशान्वये किंवा इतर कारणान्वये काम बंद पडल्यास ठेकेदारास कोणतेही नुकसान भरपाई मागण्याचा हक्क राहणार नाही.

२८) करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा ठेकेदाराने भंग केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन पूर्व नोटिस देवुन रदद करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांचेकडेस राहील.

२९) प्रत्येक कर्मचाऱ्यांचे प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना या अंतर्गत विमा काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

३०) घंटागाडी ज्या दिवशी बंद राहिल त्या दिवशी प्रती घंटागाडी व ट्रक्टर बंद राहिल्यास दंड आकारण्यात येईल.

३१) मा. आयुक्त तथा संचालक नगरपरिषदप्रशासन संचालनालय मुंबई यांचे स्थायी निदेश ३२ मधील नमुद केलेल्या अटी/ बाबी ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

३२) कंत्राटदार यांनी सादर केलेले कागदपत्र भविष्यात पडताळणी केली असता खोटे अथवा अनियमित आढळून आल्यास आपल्या विरुद्ध भारतीय दंड साहिता सदर बाबत तरतूद केलेल्या कठोर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

शहरात GVP आढळल्यास प्रती GVP रुपये १०००/- प्रमाणे कंत्राटदारावर दंड आकारण्यात येतील हा दंड कंत्राटदाराने दिलेल्या मुदतीत न भरल्यास देयकातून कपात करण्यात येतील.

३४) ठेकेदाराच्या कर्मचाऱ्याकडून गैरवर्तन, बेकायदेशीर वागणुक निर्दशनास आल्यास अशा कर्मचान्यास ठेकेदाराने तात्काळ कामावरुन कमी केले पाहीजे.

३५) सदर कामाचा कंत्राट दिल्यानंतर त्याची ठरलेली मुदत संपुष्टात येईपर्यंत काम करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. चालु परिस्थितीमधुन अचानकपणे कंत्राटदाराने कामकाज बंद केल्यास व त्यामुळे नगरपरिषदेला स्वतंत्र यंत्रणा उभी करावी लागल्यास त्याकरीता संपूर्ण खर्चाची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३६) घंटागाडी व ट्रॅक्टरव्दारे गोळा करण्यात आलेला कचरा व नाली सफाईचा कचरा प्रकल्प येथील प्रक्रिया केंद्रावरील जागेत विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

३७) सेवा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास तसेच यांबाबतीत चौकशी व पाहणीमध्ये ठेकेदार यांचा दोष आढळल्यास मुख्याधिकारी ठरवितील तेवढी सेवेची रक्कम बिलातुन कापुन घेणेत येईल.

३८) दररोज कामासंबंधी अहवाल स्वच्छता विभाग प्रमुख यांचेकडे सायंकाळी ५.०० वा पर्यंत सादर करणे आवश्क आहे.

३९) शासकीय सर्व कर आवश्यक असल्यास ते परवाने सेवा पुरवठाधारकाने स्वतः घेणेचे आहेत याबाबतीत कोणत्याही कायदेशिर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार राहणार नाही.

४०) ठेकेदाराने अटी व शर्तीसह निविदा न भरल्यास ती निविदा स्विकारता येणार नाही.

४१) ठेकेदाराने सदर घनकचरा व्यवस्थापन कामासाठी स्वतंत्र लेखे ठेवले पाहिजेत याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारावर असेल.

४२) अटी व शर्ती बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

४३) सेवा पुरवताना कोणताही वाहनांमध्ये बिघाड आल्यास किंवा आगीमुळे नासधूस झाल्यास किंवा नुकसान झाल्यास त्यास सेवा पुरवठादार जबाबदार राहतील तसेच कोणतेही जीवित हानी झाल्यास सेवा पुरवठादार जबाबदार राहतील.

४४) कंत्राटदाराने काम समाधानकारक न केल्यास नगरपरिषदे तर्फे पर्यायी व्यवस्थेने कचरा उचलुन घेतल्यास त्यावर होणारा संपुर्ण खर्च १०% दंडासहीत माहेबारी देयकातुन वसूल करण्यात येईल.

४५) कंत्राटदाराने काम समाधानकारक न केल्यास मध्येच काम सोडल्यास दंड करण्याचा किंवा कंत्राट रद्द करण्याचा व नव्या कंत्राट दिल्यास अतिरिक्त खर्चाची रक्कम दंडासहीत वसुल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी न.प. सावनेर यांना राहील. तसेच सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

४६) मंजुर झालेल्या निविदाधारकास द्वितीय कंत्राटदार नेमणूक काम देता येणार नाही. कंत्राट अहस्तांतरणीय राहील. तसेच वरील अटी व शर्तीमध्ये काही त्रुटी राहील्यास त्या करारनाम्याच्या वैधतेवर परिणाम नाहीत.

४७) सदर अटी व शर्तीचे व्यतिरिक्त शासनाकडून निर्देश आल्यास काही नियम, नोटीफिकेशन आल्यास तसेच आवश्यक वाटयास नविन अटी व शर्ती टाकण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर नगरपरिषद सावनेर यांना राहील.

४८) कंत्राटदरास १८ वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीस कामगार म्हणून नेमू शकणार नाही. तसेच ५८ वर्षावरील व्यक्तीस कामगार म्हणून नेमू शकणार नाही. तसेच गुन्हेगारी स्वरुपाची पार्श्वभूमी / रेकार्ड असणा-या व्यक्तीस कामावर नेमता येणार नाही.

४९) The Party – 2 has to ensure compliance of all applicable labour laws provisions including but not limited to as per their applicability:

- Apprentice Act, 1961
- Contract Labour (Regulation & Abolition) Act, 1970
- Child Labour (Prohibition and Regulation) Act, 1986
- Employees Provident Fund and Miscellaneous Provisions Act, 1952
- Employees' State Insurance Act, 1948
- Equal Remuneration Act, 1976
- Industrial Disputes Act, 1947
- Industrial Employment (Standing Orders) Act, 1946
- Inter-state Migrant Workmen (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1979.
- Minimum Wages Act, 1948
- Maharashtra Shops and Establishments Act
- Maharashtra Labour Welfare Fund Act.
- Maternity Benefit Act, 1961

- Payment of Wages Act, 1936
- Payment of Gratuity Act, 1972
- Payment of Bonus Act, 1965
- Trade Unions Act, 1926
- Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition & Redressal) Act, 2013 (14 of 2013).

५०) शहरात दररोज निर्माण होणाऱ्या १००% विलगीकृत घनकचऱ्याचे घरोघरी (door to door) जाऊन संकलन व वाहतूक, ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यात यावी व सुक्या कचऱ्याचे पुनश्च विलगीकरण करून तो पुनर्प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात यावा.

५१) प्रक्रिया होऊ न शकणारा उर्वरित सुका कचरा भरावभूमीवर पाठविण्यात यावा.

५२) FCO Norms नुसार सदर कंपोस्ट खताची तपासणी करून "**हरित महा सिटी कंपोस्ट**" ब्रँड मिळवणे.

५३) एकूण ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार होणे अपेक्षित आहे, शहरात दररोज निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून तयार होणाऱ्या कंपोस्टबाबत केंद्र शासनाच्या mFMS (Mobile Fertilizer Monitoring System) पोर्टलवर नोंदणी (Registration) करण्यात यावी.

५४) कामाच्या स्थळी **अग्निशमन उपकरणे व प्रथमोपचार कीट** ठेवणे बंधनकारक आहे.

५५) कोणत्याही कारणामुळे कर्मचाऱ्यांनी संप किंवा काम बंद केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील व याकरिता कंत्राटदारावर संप किंवा काम बंद कालावधीत दंड आकारण्यात येईल.

५६) नगरपरिषद मार्फत पुरविण्यात येणाऱ्या वाहनाचे देखभाल दुरुस्तीचे देयके हे नगरपरिषदेला सादर करावे लागेल तदनंतरच त्याचे देयके कंत्राटदाराला अदा करण्यात येईल. (अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार)

५७) वाहनाचे देखभाल दुरुस्तीचे दर हे Collection and transportation मध्ये समाविष्ट असल्याने सदर काम हे अंदाजित रकमेपेक्षा कमी झाल्यास अतिरिक्त रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात करण्यात येईल.

५८) **प्रक्रिया केंद्रावरील कर्मचाऱ्यांसाठीः**

अ. ओल्या कचऱ्यावर प्रक्रियाः

* ओल्या कचऱ्यामधील इतर कचरा म्हणजे कागद, प्लास्टिक, धातू इ. घटक वेगळे करणे.
* कचरा श्रेडरद्वारे बारीक करून त्यामध्ये Bio-culture मिसळणे (निर्धारित प्रमाणांनुसार).
* यानंतर कचरा पिट मध्ये किंवा विन्ड्रो प्लॅटफॉर्मवर ढीग करून ठेवणे.
* आवश्यकतेनुसार पाणी/कल्चर फवारणे.
* पिटमधील कचरा दर ३-४ दिवसांनी किंवा विन्ड्रोमधील कचरा दर ७ दिवसांनी बदलणे.
* ३५-४० दिवसानंतर कचरा १६ मि.मि / २० मि. मि च्या चाळणीमधून काढून curing साठी पुढील ७-१४ दिवस ढीग करून ठेवणे.
* त्यानंतर ४ मि. मि च्या चाळणीतून काढून साठवणुकीसाठी बंदिस्त जागेमध्ये ठेवणे.
* सुरक्षिततेच्या नियमांचे पालन आणि काळजीपूर्वक काम करणे.

ब. **सुक्या कचऱ्यावर प्रक्रियाः**

* MRF मध्ये कचरा आणणे आणि उतरवणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कचऱ्याच्या वर्गवारीनुसार साठवण करणे (जसे की कागद/पुठ्ठा, प्लास्टिक, धातू, काच, कापड इ.). कचरा वेगळा करण्यासाठी (conveyor बेल्ट) आणि प्रक्रिया करण्यासाठी (beller/shredder) वापरली जाणारी उपकरणे आणि यंत्रांचा योग्य वापर हाताळणी व देखभाल करणे.

उपकरणांची दुरुस्ती आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक माहिती यंत्र पुरविणाऱ्या agency मार्फत करून घेणे

* सुरक्षिततेच्या नियमांचे पालन आणि काळजीपूर्वक काम करणे.

कचरा प्रक्रियाकेंद्रावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणेः

* नाकाच्या अडकणीसह मुखपट्टी (मास्क)
* हातमोजे
* परावर्तित आवरण (Reflective Jacket)
* सोयीस्कर जोडे/बूट

**घनकचरा संकलन व वाहतूक (वाहन कर्मचारी)**

वाहनावरील कर्मचाऱ्यांची जबाबदारी

* दैनंदिन हजेरीसाठी नियोजित ठिकाणी व नियोजित वेळेत उपस्थित राहणे.

ाड्यांच्या वेळापत्रकाचे/रूट मॅपचे पालन करणे, क्यू आर कोड घरोघरी स्कॅन करून अहवाल द्यावा लागेल. त्यानुसारच देयके अदा करण्यात येईल.

* विलगीकृत कचऱ्याचे संकलन व वाहतूक नागरिकांकडून विलगीकृत कचरा घेणे व घंटागाडीवर पुरेशी व्यवस्था कप्पे, बकेट, पोती इ. व्यवस्था) उपलब्ध करून संकलन व वाहतूक करणे (ओला, सुका, सॅनिटरी कचरा, घरगुती घातक कचऱ्याबाबत माहितीपत्रक लावणे)

**कचरा विलगीकरणाबाबत नागरिकांना माहिती देणे व विलगीकृत कचरा देण्याबाबत आवाहन करणे**

कचऱ्याच्या संकलनाच्या नोंदी आपल्या नोंद वहीमध्ये ठेवणे

* कचऱ्याच्या सुरक्षित हाताळणीसाठी PPE चा वापर करणे
* दैनंदिन कामाचा आढावा व पुढील कामाच्या नियोजनाबाबत मुकादमांसोबत चर्चा करणे.कचरा गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणेः
* नाकाच्या अडकणीसह मुखपट्टी (मास्क)हातमोजे
* परावर्तित आवरण (Reflective Jacket)
* सोयीस्कर जोडे/बूट

५९) संनिर्माण आणि भंजन (C&D) अपशिष्ट व्यवस्थापन नियम, २०२५' अंतर्गत असलेल्या नियम व अटी शर्ती पालन करणे बंधनकारक राहील.

६०) वरील सर्व अटी व शर्ती व्यतिरिक्त उर्वरित कामे अंदाजपत्रकानुसार राहतील. (सोबत जोडण्यात आले आहे.)

**टीप - घनकचरा व्यवस्थापन व संकलन प्रक्रिया निविदेसाठी बयाना रक्कम व निविदा फॉर्म रक्कम भरणा हा ऑनलाईन पद्धतीनेच करावा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **स्वच्छता व आरोग्य निरीक्षक** | **अभियंता** | **लेखापरीक्षक** | **लेखापाल** | **मुख्याधिकारी** |
| **नगर परिषद सावनेर** | **नगर परिषद सावनेर** | **नगर परिषद सावनेर** | **नगर परिषद सावनेर** | **नगर परिषद सावनेर** |

परिशिष्ट - अ

( सदर प्रतिज्ञापत्र हे रू. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करून निविदेसोबत जोडावे )

## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 16 (1) (आय) व कलम 44 (1) (ब) तरतुदीच्या, ज्या खाली निर्दिष्ट केलेल्या आहेत, माहीती आहेत आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालीकेशी किंवा नगरपालीकेच्या अधिन किंवा नगरपालीकेने किंवा नगरपालीकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंधे किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

कलम 16 (1) (आय) यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालीकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालीकेशी किंवा नगरपालीकेच्या अधिन किंवा नगरपालीकेने किंवा नगरपालीकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

कलम 44 (1) (ब):- पालीका सदस्य म्हणुन किंवा नगरपालीकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलग 16 चे पोट कलम (3), खंड (अ). (व). (क). (ई) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा जी त्याच अशिलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिकदृष्टया त्यांचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा बाबतीत मतदान करील.

निविदा धारकाचे नाव : ______________________________

पत्ता व मोबाईल क्र. : ______________________________

:________________________________ निविदा धारकाची सही

**दिनांक :** / /२०२६

पत्ता व मोबाईल क्र. : ______________________________

साक्षीदाराचे नाव : ______________________________

पत्ता व मोबाईल क्र. : ______________________________ साक्षीदाराची सही

**दिनांक :** / /२०२६

परिशिष्ट – ब

( सदर प्रतिज्ञापत्र हे रू.100/- च्या स्टॅम्प पेपरवर करून निविदेसोबत जोडावे )

## प्रतिज्ञापत्र

मी______________________________________________वय_________वर्ष

राहणार_______________ता.__________जि.__________

सत्यप्रतिज्ञा लेखादबारे लिहून देतो की, मी____________________________या कंपनीचा/संस्थेचा प्रोप्रायटर असुन मी नगरपरिषद सावनेर स्वच्छता विभाग कडील सन २०२६-२७ करीता स्वच्छं महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तसेच घनकचरा व्यवस्थापन अधिनियम 2016 व प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन अधिनियम 2024 अन्वये सावनेर शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकृतरित्या संकलन करून वाहतुक व प्रक्रिया करणे या कामाकरीता ई-निविदा सादर केली आहे. सदर निविदेसोबत जी कागदपत्रे सादर केली आहेत ती कागदपत्रे सत्य, बरोबर व परिपुर्ण आहेत. सदर कागदपत्रांमध्ये त्रुटी किंवा चुका नाहीत असे शपथपुर्वक मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही त्रुटी अथवा चुका तसेच खोटी दिशाभुल करणारी किंवा अपुर्ण माहीती आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

निविदा धारकाचे नाव ______________________________________

पत्ता व मोबाईल क्र. ______________________________________

______________________________________ निविदा धारकाची सही

**दिनांक :- / /२०२६**

साक्षीदाराचे नाव ______________________________________

पत्ता व मोबाईल ______________________________________

______________________________________ साक्षीदाराची सही

**दिनांक:- / /२०२६**

(Appendix - A)

CONVERING LETTER

To,

Date :-

Chief Officer

NAGAR PARISHAD, SAONER,

Saoner.

Reference :-

Sir,

Being duly authorized to represent and act on behalf Of ______________________________ (Hereinafter referred to as the Bidder) and having reviewed and fully understood all of the proposal requirements the undersigned herby submits the proposal on behalf of (Name of Bidder ______________________________ ________________) for the job as indicated below with details as per the requirements of the specification for your evaluation.

Yours Faithfully

For and on behalf of (Name of Bidder) ____________________________

Duly signed by the Authorized Signatory of the Bidder

Authorized Signatory

Name :- ----------------------------------------------------------------------------------------

Title :- ----------------------------------------------------------------------------------------

Address :- ------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

# CURRICULUM VITAE

i. Name of Staff :
ii. Proposed Position :
iii. Profession :
iv. Date of birth :
v. Years with Firm :
vi. Nationality :
vii. Education :
viii. Languages (indicate the degree of proficiency - good, fair, poor, nil) :

| Language | Speaking | Reading | Writing |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

ix. Employment Record :

(Starting with the latest, furnish details in the following format)

From- to:

Position :

Duties :(Starting with present position, list in reversed order, and every employment held. List all positions held by staff member since graduation, giving dates, names of employing organization, title of positions and location of assignments. For experience period of specific assignment must be clearly mentioned, also give client reference, where appropriate).

# CERTIFICATION

I, the undersigned, certify that to the best of my knowledge and belief, this bio-data correctly Describes my qualifications my experience and myself.

Place : Signature ----------------------------

Date : Name -------------------------------

Address : - ----------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------

(This proforma should be filled only by the L1 bidder and submitted while issuing workorder)

Signature Not Verified

Digitally signed by SANDIP DASHRATHJI KOLTE
Date: 2026.05.14 19:26:48 IST
Location: Maharashtra-MH